# गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविण्यात 'डीकेटीई'ची भरारी

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षामध्ये डीकेटीईच्या टेक्स्टाईल अॅण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटने अभियांत्रिकी विद्या शाखातून निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.देवानंद बी.शिंदे यांच्या हस्ते डीकेटीईच्या टेक्स्टाईल अॅण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटचा गुणवत्ता प्राप्त महाविद्यालय म्हणून सत्कार करण्यात आला.

हा सत्कार संस्थेचे डायरेक्टर प्रा. डॉ.पी. व्ही. कडोले, डेप्युटी डायरेक्टर प्रशासकीय प्रा.डॉ. यु. जे. पाटील, डेप्युटी डायरेक्टर शैक्षणिक प्रा. डॉ. एल. एस. आडमुठे यांनी स्वीकारला. विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागत उच्च शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीची' निर्मिती केली आहे. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ शैक्षणिक वर्ष सन २०१७-२०१८ गटनिहाय गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या सत्कार समारंभाप्रसंगी अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.देवानंद बी. शिंदे होते.



**शिष्यवत्ती गुणगौरव समारंभात प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले व त्यांचे सहकारी यांच्या सत्कार प्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे, बीसीयुडी डायरेक्टर डी. आर. मोरे आदी.**

डॉ. कडोले म्हणाले, ज्ञान संस्कारातील प्रोत्साहनाला शिष्यवृत्ती हे माध्यम आहे व या शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहकार्य व प्रेरित करणे आणि आत्मविश्वास वाढविणे हा उद्देश आहे. डीकेटीईमध्ये गेली ३६ वर्षे विद्यार्थी केंद्रित दृष्टी ठेवून तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकांद्वारे हे कार्य केले. त्याचीच परिणिती डीकेटीईच्या सर्वाधिक विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती पटकावली. निमशहरी विभागात डीकेटीईचे सर्वाधिक विद्यार्थी येऊन डीकेटीईने आपली शैक्षणिक गुणवत्ता शिवाजी विद्यापीठात सिद्ध केलेली आहे.

विद्यापीठ पातळीवर संस्थेने मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, सचिव डॉ.सपना आवाडे व सर्व विश्वस्त यांनी प्राचार्य डॉ.कडोले व सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

8 SEP 2018

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पर्यावरण पूरक गणेशमूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण

प्रतिनिधी
कोल्हापूर

उदय पाटील यांनी शाडू माती,गायीचे शेण, मुलतानी माती, गणेश गंध, शेवग्याच्य बियांची पावडर यांचा वापर करून गणेशमूर्ती कशी बनवावी याची माहिती व प्रात्यक्षिक दिले. शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित ''पर्यावरणपूरक गणेशोत्सव' कार्यशाळेत त्यांनी विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक शिकवले. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांकडून चांगला



प्रतिसाद मिळाला.

गणेशोत्सव हा आनंदाला उधाण आणणारा सण असला तरी या सणामध्ये मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होते. ती हानी रोखण्यासाठी व आनंद अबाधित ठेवण्यासाठी प्लास्टर ऑफ पॅरीस व रासायनिक रंगाचा वापर टाळून पर्यावरणपूरक घटकांचा वापर करून गणेशमूर्ती तयार करता येऊ शकते. या गोष्टी या कार्यशाळेत शिकवण्यात आल्या.

मारुती पाटील म्हणाले, अशा पद्धतीने तयार केलेल्या गणेशमूर्तीमुळे जलप्रदूषण कमी प्रमाणात होते व तयार होणारा घनकचरा हे शेतीसाठी उत्तम प्रकारचे सेंद्रिय खत ठरू शकते. रघुनाथ शृंगारे हे पंचगव्यापासून गोमाई गणेश बनवतात. मूर्ती बनवण्यासाठी ते देशी गायीचे शेण, गोमूत्र, दही, तूप, ताक, हळद इत्यादी घटकांचा वापर करतात. पंचगव्यापासून गणेशमूर्ती ही विसर्जनानंतर काही तासांत विघटीत होते. ते विघटीत अवशेष शेतीसाठी उत्तम खत म्हणून उपयुक्त ठरतात.

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांचे मार्गदर्शन केले. डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पल्लवी भोसलेयांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 SEP 2018
तरुण भारत

# इंग्रजी अधिविभागाचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागाचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यातील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते. प्रा. चिकोडे, प्रा. जे. ए. शिंदे, प्रा. पी. ए. अत्तार यांनी अधिविभागा बाबत मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी अधिविभागामार्फत नवनवीन शैक्षणिक सुधारणाबाबत वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोजन करावे अशा अपेक्षा व्यक्त केल्या. तसेच विद्यापीठातील अधिविभाग व विविध महाविद्यालयीन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अधिकाधिक कार्यक्रम हाती घ्यावेत अशा सूचनाही केल्या. डॉ. ए. एम. सरवदे यांनी प्रस्ताविक केले. डॉ. सी. ए. लंगरे यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी समिती समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर उपस्थित होते.

# नेत्रदानाचा संकल्प करून मृत्युंजय बना : डॉ. अभिजित ढवळे

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** नेत्रदानाचा संकल्प करून मृत्युंजय बनण्यासाठी समाजामध्ये जागृती होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राजर्षी छत्रपती शाहू गव्हर्न्मेंट मेडिकल कॉलेजचे प्रा. डॉ. अभिजित ढवळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागामध्ये राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. यावेळी अनुप्रिता घोरपडे यांनी फॉर्म भरण्यासंबंधी मार्गदर्शन केले. प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. एम. पी. भिलावे यांनी आभार मानले. उपस्थित विद्यार्थ्यांनी नेत्रदानाचे फॉर्म भरले. यावेळी डॉ. माधुरी वाळवेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. विनीता रानडे, डॉ. एस. आर. यंकची, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. एन. ए. कांबळे, डॉ. ए. ए. देशमुख व डॉ. ए. डी. जाधव आदींसह प्राणीशास्त्र अधिविभागातील सर्व प्रशासकीय सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.